## -घोषणा-

**शासन शुध्दीपत्रक दि. १९ डिसेंबर, २०१८ नुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत.**

शासनाच्या समांतर आरक्षणासंदर्भात दिनांक- १३ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन परिपत्रकास अनुसरुन निर्गमित केलेल्या शासन शुध्दिपत्रक क्रमांक: संकीर्ण- १११८/प्र. क्र.३९/१६-अ, दिनांक- १९ डिसेंबर, २०१८ मधील तरतुदी विचारात घेता ज्या पदाच्या परीक्षांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, कोणतेही निकाल घोषित झालेले नाहीत, अशा परीक्षांचे तसेच यापुढील विज्ञापित होणा-या सर्व परीक्षांची निकाल प्रक्रिया शासनाच्या दिनांक- १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदी विचारात घेवून राबविण्यात येणार आहेत.

तसेच ज्या पदाच्या परीक्षा दिनांक- १९ डिसेंबर, २०१८ पुर्वी झाल्या आहेत. परंतु सदर परीक्षांचे पूर्व/मुख्य/अंतिम अशा कोणत्याही टप्प्यावरील निकाल घोषित झालेले नाहीत. अशा परीक्षांची निकाल प्रक्रिया शासनाच्या दिनांक- १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदी विचारात घेवून राबविण्यात येत आहे.

दिनांक : २७ मार्च, २०१९.

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**